# <u>नियमित दिवाणी दावा क्र.२५९/२०१३ मधील निशाणी ६८ वरील आदेश</u>

वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.1 प्रभाकर वामन वैराळ हे दिनांक ३०/०३/२०१६ रोजी मयत झालेले आहे. त्याबाबतची माहिती प्रतिवादींतर्फे दिनांक १७/०७/२०२३ रोजी पुरसीस देवून कळवली आहे. प्रतिवादी क्र.1 प्रभाकर वामन वैराळ हे दिनांक ३०/०३/२०१६ रोजी मयत झाले आहेत. दिनांक ३०/०६/२०१६ पावेतो वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे होते. परंतु वारस रेकॉर्डवर घ्यावे लागतात याचे अज्ञाना मुळे माहिती नसल्याने मृत्यूची माहिती वकीलांना दण्यात आली नाही. त्यामुळे मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाही.

२. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे देवून अर्जातील कथने नाकारली आहेत.

३. अर्ज वाचला, म्हणणे पाहिले. त्यामध्ये नमुद केलेले कारण विचारात घेतले तसेच यातील प्रतिवादी क्र.1 चे वारसानां बाजू मांडण्याची संधी देणे योग्य वाटते. अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव झालेला उशिर माफ करुन अबेटमेंटचा हुकूम सेट असाईड करणे योग्य व न्यायोचित वाटते. सबब, मी पुढील आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. वादीचा निशाणी ६८ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादींना खर्चापोटी रक्कम रु.१०००/- द्यावे.

सही/-

**( दि. म. गिरी )**

६ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
संगमनेर, जि. अहमदनगर

दिनांक: १६/०८/२०२३